स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास (२०१५-२०२०)

सामाजिकशास्त्रे शाखेअंतर्गत 'अर्थशास्त्र' विषयात पीएच. डी पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

-: संशोधक :-

कमलकिशोर शिवाजी तोडे

संशोधन केन्द्र

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

-: मार्गदर्शक :-

डॉ. प्रा . सूर्यकांत टी. पवार

विभाग प्रमुख (अर्थशास्त्र)

लोकमान्य महाविद्यालय सोनखेड

ता. लोहा जिल्हा. नांदेड,

जुलै २०२१

हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

जातिसंस्था ही भारतीय समाजातील एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. भारतीय समाजव्यवस्थेचे ते एक खास वैशिष्ट्य आहे. भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतिक जीवनाचे रंगरुप जातिव्यवस्थेनुसारच ठरते व्यक्तीची जीवनपद्धती व तिच्या सामाजिक संबंधाचे स्वरुप जातीनुसारच आकारत असते. एवढा जबरदस्त पगडा जातीचा भारतीय जनमानसावर असलेला दिसतो. अशी जातिसंस्था जगात कोठेही आढळत नाही जी कधी जात नाही ती जात ' असे म्हणण्याची वेळ यावी इतकी जातिसंस्था ही समाजात पक्के मूळ धरुन राहिली. शेकडो वर्षाच्या जातिसंस्थेच्या परंपरेमुळे लोकांच्या मनोवृत्तीतही जातीसंबंधीचे संस्कार पक्के घर करून बसले आहेत. यामुळेच जातिव्यवस्थेला भारतीय समाजाचा पाया मानला जातो. भारतीय समाजाचे स्वरुप समजावून घेत असताना भारतातील जातिव्यवस्थेचा प्राधान्याने अभ्यास करावा लागतो. त्यामुळेच भारतीय समाजव्यवस्थेचे स्वरुप जाणून घेऊ इच्छिणारे अनेक भारतीय व पाश्चात्य अभ्यासक जातिव्यवस्थेच्या अभ्यासाकडे वळले एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, बालहत्या, सतीप्रथा इ. सारख्या विविध प्रश्नांवर विचार व्यक्त झाले, चळवळी झाल्या. त्यात सर्वात आघाडीवरील व आव्हानात्मक प्रश्न जातिव्यवस्थे संबंधीचा होता. विशेषत : ब्रिटिशांची राजवट भारतात स्थिरावल्यानंतर खिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसार करत असताना भारतातील जातिव्यवस्थेतील दोषांकडे लोकांचे लक्ष केंद्रित केले. या सर्व परिस्थितीत अनेक अभ्यासक भारतातील जातिव्यवस्थेच्या अभ्यासाकडे वळले. त्यातून वेगवेगळ्या जातीचा वेगवेगळ्या अंगांनी शास्त्रीय अभ्यास होऊ लागला. त्यामुळेच आज भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासात जातिसंस्थेच्या अभ्यासाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.

डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये डॉ. इरावती कर्वे, एम. एन. श्रीनिवास यांनी भारतीय जातिव्यवस्थेचा विविध अंगाने अभ्यास करून भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासात जातिव्यवस्थेच्या अभ्यासाचे महत्त्व, गरज अधोरेखित केलेली आहे व वेगवेगळ्या जातीच्या संदर्भात संशोधनाला चालना दिलेली आहे. याच प्रेरणेतून मी जातीविषयक संशोधनाकडे वळलेलो आहे. पुरातन काळापासून जात एक व्यवस्था वा संस्था म्हणून भारतीय समाज जीवनाचे अपरिहार्य अंग राहिले आहे. पर्यायी व्यवस्था नसल्याने श्रमविभाजन आणि लोकसेवा यांची श्रेणीरचना म्हणून (उतरंड) जाती व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्त्व होते. मात्र सामाजिक महत्त्व आणि त्या त्या जातीय गटाचे हितसंबंध यातून श्रेष्ठ कनिष्ठता, भावना आणि वादीय धारणा तयार होऊ लागल्या. यातूनच अन्याय अत्याचार या प्रवृत्ती बळावल्या एकेकाळी व्यवस्था म्हणून स्वीकारलेली जात नंतरच्या काळात समस्या म्हणून अभ्यासण्याची वेळ अभ्यासकावर आली. म्हणून भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचे स्वरुप व्यवस्था आणि समस्या या दोन भागात अभ्यासावी लागते.

महाराष्ट्रामध्ये आणि मराठवाड्यामध्ये संख्येने अधिक असणारी एक प्रबळ जात मराठा जात आहे. जातीच्या संदर्भातील झालेले लिखाण व माझे या संदर्भातील वाचन यामधून लक्षात आले की, मराठा जातीबाबत जे लिखाण झालेले आहे ते अपुरे आहे. त्यामुळे मराठा एक समाज आहे हा दृष्टिकोन नजरेसमोर ठेऊन मराठा जातीचा अभ्यास करण्याचे निश्चित केले. व त्याआधारे मराठा समाजाचे स्थान काय आहे ? स्थिती नेमकी कशी आहे हे शोधण्यासाठीच " हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास " असा विषय संशोधनासाठी घेतलेला आहे मराठा समाजाच्या स्थितीचा अभ्यास करत असताना प्रथमतः वर्णव्यवस्थेचा उदय, जातिव्यवस्थेचा उदय आणि नंतर मराठा जातीचा उदय विकास, मराठा जातीतील कुळी वर्णव्यवस्थेत मराठा जातीचे स्थान पोटजाती अशी मांडणी केलेली आहे. कारण बहुसंख्य अभ्यासकांनी हे मान्य केलेले आहे की प्रथम वर्णव्यवस्था उदयाला आली आणि नंतर जातिव्यवस्थेचा उदय झालेला आहे. उदा. हर्बर्ट रिसले

वि. का. राजवाडे, डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये इ. त्यामुळे प्रथमतः वर्णव्यवस्थेच्या निर्मितीचा उदयाचा शोध घेतलेला आहे व नंतरच जातिव्यवस्थेच्या संदर्भात अध्ययन केलेले आहे.

नैसर्गिक शास्त्रातील संशोधनाप्रमाणेच सामाजिक शास्त्रातील संशोधनासाठी संशोधनाची पद्धती वापरली जाते. अध्ययनाचा विषय वेगवेगळा असला तरी संशोधनाची पद्धती मात्र एकच असते. संशोधन करताना म्हणजेच नवज्ञानाची निर्मिती करीत असताना एक विशिष्ट पद्धत वापरावी लागते. त्यालाच आपण संशोधन पद्धती असे म्हणतो. संशोधनाला इंग्रजीत Research म्हणतात Research म्हणजे पुनःपुन्हा शोध घेणे होय. नवीन तथ्ये शोधण्यासाठी आणि जुन्या तऱ्यांच्या परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय. थोडक्यात संशोधन ही एक नवीन ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया असून संशोधनाद्वारे जुन्या ज्ञानाचे पुनर्परीक्षण केले जाते. हे संशोधन करत असताना एक शास्त्रीय अशी पद्धत वापरावी लागते. त्याशिवाय संशोधन पूर्णत्वास जात नाही. कोणत्याही घटनांचे वस्तुनिष्ठरित्या आकलन या शास्त्रीय पद्धतीद्वारेच शक्य असते. कारण संशोधन पद्धतीमध्ये शास्त्रीय पद्धतीने तथ्याचे संकलन केले जाते. वर्गीकरण केले जाते आणि निर्वचन केले जाते.

थोडक्यात कोणत्याही संशोधन विषयाचे यश अभ्यास कसा केला यावरच अवलंबून असते. त्यामुळे सामाजिक शास्त्रातील संशोधनामध्ये संशोधन पद्धतीला अतिशय महत्त्व आहे. संशोधन कसे करणार याचा एक स्थूल स्वरूपाचा आराखडा तयार केला जातो. त्यालाच कार्ययोजना आखणे असे म्हणता येईल शास्त्रीय भाषेत त्याला संशोधन आराखडा असे म्हणतात. या संशोधन आराखड्याच्या संदर्भात " सेल्टिज, जहोडा इश व कूक म्हणतात की, " संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी निष्कर्षाची सबंद्धता आणि संशोधन कार्यातील मितव्यय यांची सांगड घालता येण्याच्या दृष्टीने तथ्यांचे संकलन आणि विश्लेषण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अटींची नियोजित व्यवस्था म्हणजेच संशोधन आराखडा होय तर ऐकॉफ म्हणतात की, " निर्णय क्रियान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारित करण्याच्या प्रक्रियेला आराखडा असे म्हणतात. एकूणच संशोधन आराखडा ही एक

कार्ययोजना असून समस्येच्या निर्धारणापासून ते संशोधन अहवालाच्या शेवटच्या पायरीपर्यंतच्या विषयाबाबतचे योग्य नियोजन त्याच असते. विषय निवड, नमुना निवड, तथ्य संकलन, वर्गीकरण निर्वचन इ. सारख्या बाबी या संशोधन आराखड्यामध्ये स्पष्ट केलेल्या असतात हा संशोधन आराखडाच संशोधनकर्त्याला मार्गदर्शन करण्याचे काम करत असतो. शिवाय कमीत कमी वेळ व पैसा खर्च होतो आणि जास्त प्रमाणात संशोधन उद्दिष्टाची प्राप्ती करता येते.

प्रस्तुतच्या संशोधन विषयासाठी जो संशोधन आराखडा तयार केलेला आहे. यासाठी जी संशोधन पद्धती वापरलेली आहे ती खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येईल.

विषय समस्या सूत्रण :

हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थिती चा अभ्यास करतांना संशोधकाने मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत व मराठा समाजाच्या विकासामध्ये कोनते घटक अडथळा बनत आहेत या व हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाच्या दयनीय अवस्थेला कोणते घटक कारणीभूत आहेत अश्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी संशोधकाने " हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास. " या समश्येचा निवड केली आहे.

विषय निवड :

संशोधनातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे विषय निवड हा आहे. संशोधनासाठी जो विषय निवडलेला आहे तो विषय का निवडला हे स्पष्ट करावे लागते. म्हणजेच या विषयावर संशोधन होणे गरजेचे होते काय ? ते स्पष्ट करावे लागते. प्रस्तुतच्या संशोधनासाठी " हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास " हा विषय निवडलेला आहे. संशोधनासाठी हाच विषय का निवडला त्याची कारणे कोणती आहेत. हे स्पष्ट करणे गरजेचे ठरते. प्रस्तुत विषय निवडण्यामागची पार्श्वभूमी अशी होती की, महाराष्ट्राचा एक मुख्य महसूल विभाग

असलेला व ज्याला आद्य महाराष्ट्र म्हणून संबोधले जाते अशा मराठवाड्यात इतर कोणत्याही जातीपेक्षा संख्येच्या दृष्टीने मराठा समाज मोठा आहे त्याचप्रमाणे संपूर्ण समाज जीवनाचा सामाजिक व आर्थिक आधार असणा - या मराठा जातीने समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रावर प्रभाव पाडलेला आहे. साहजिकच या समाजातील लोकांच्या दृष्टिकोनाचा कार्याचा चांगला वाईट परिणाम मराठवाड्याच्या विकासावर झालेला आहे. साहजिकच अशा प्रभुत्वशाली जातीचे अध्ययन करावे असे वाटू लागले व ती बाब प्रस्तुतच्या विषय निवडीसाठी कारणीभूत ठरलेली आहे. याशिवाय मराठा जातीबाबत जे लिखाण झालेले आहे ते अपुरे व विखुरलेले आहे. अशा लिखाणामधून मराठा समाजाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, वैवाहिक, कौटुंबिक जीवनाची निश्चित कल्पना येत नाही. ही संदिग्धता कमी करावी आणि मराठा जातीची स्थिती निश्चित करावी. हे कारण हा विषय निवडण्यापाठी मागचे आहे. याशिवाय मराठा समाजात अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. उदा : दारिद्रय, अंधश्रद्धा रूढीवाद, बुवाबाजी, बालविवाह हुंडा प्रथा अशा अनेक समस्यांनी हा समाज व्यापलेला आहे. मराठा समाजातील या समस्याची कारणे शोधून समस्या सोडविण्यासाठी काही मदत होईल ही संशोधन विषय निवडीमागची पार्श्वभूमी आहे.

थोडक्यात मराठा समाजाच्या इतिहासाचे अध्ययन करून मराठा समाजाच्या स्थितीबाबत जी मतभिन्नता आहे ती कमी करून मराठा समाजाची स्थिती निश्चित करणे आणि मराठा जातीतील विविध सामाजिक समस्या सोडविण्याला मदत करणे हीच या संशोधनविषय निवडी मागची पार्श्वभूमी आहे. प्रस्तुतचा संशोधन विषय निश्चित करण्यापूर्वी या संदर्भातील माहिती संकलित करून साहित्याचे वाचन लिखान केले. संशोधन विषय निवडीची आवश्यकता आजमावली या विषयाच्या बाबतीतील संकल्पनांची यादी तयार करून त्याचा नेमका अर्थ समजावून घेतला.

संशोधनाचा उद्देश :

कोणत्याही ज्ञान शाखेतील संशोधन असो त्या संशोधनाला उद्देश हा असतोच उद्देशाशिवाय संशोधनाला अर्थ उरत नाही. " हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक

स्थितीचा चिकित्सक अभ्यास " या विषयाची निवड करताना काही महत्त्वपूर्ण उद्देश निश्चित केलेले होते. प्रस्तुत संशोधनाचे काही उद्देश खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत.

१) हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाच्या जीवनमानाचा अभ्यास करणे.

४) हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाच्या शैक्षणिक व व्यावसायिक स्थितीचा अभ्यास करणे.

हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये येणाऱ्या समस्या शोधून त्यावर उपाय योजना करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :

सामाजिक शास्त्रातील संशोधनात संशोधन विषयाची निवड निश्चित झाल्यानंतर संशोधनासाठी संशोधकाने काही गृहितकृत्ये मांडावी लागतात. संशोधनविषयाच्या संदर्भात जे काही प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान असते. अनुभव आलेले असतात. त्या आधारावर संशोधन विषयाच्या संदर्भात काही अनुमान काढलेले असतात. त्यालाच शास्त्रीय भाषेमध्ये गृहितकृत्ये असे म्हणतात. थोडक्यात गृहितकृत्ये संशोधन कार्याचा आधार आणि वैज्ञानिक कार्याचा एक मदतगार बनते जर संकलित तथ्यांच्या आधारावर गृहितकृत्ये सिद्ध होत असेल तर त्या गृहितकृत्याचे रूपांतर सिद्धांतामध्ये होत असते. " हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास " या विषयाच्या अनुषंगाने जे प्राथमिक स्वरुपाचे ज्ञान अनुभव होते. त्याआधारे काही गृहितकृत्ये खालीलप्रमाणे मांडलेली आहेत.

१) हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाज आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास आहे.

२) हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा जीवनमानाचा दर्जा कमी आहे.

३) मराठा समाजाची शैक्षणिक आणि व्यावसायिक स्थिती खालावत आहे.

संशोधनाचे कार्यक्षेत्र व्याप्ती व मर्यादा :

" हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास " हा संशोधनासाठी निवडलेला विषय देशपातळीवर, महाराष्ट्राच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा असला तरी तेवढ्या व्यापक पातळीवर अध्ययन करणे शक्य होत नाही म्हणून मराठवाडा हे संदर्भक्षेत्र ठरविले. कारण महाराष्ट्रातील सर्वच मराठा जातीतील सर्वच लोकांचे अध्ययन करणे शक्य नसते. शिवाय विभागनिहाय जीवनपद्धतीत फरकही आढळतो म्हणूनच संदर्भक्षेत्र म्हणून मराठवाड्याची निवड केली. तर प्राथमिक स्त्रोताचा भाग म्हणून तथ्य संकलनासाठी समग्र म्हणून हिंगोली जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. यासाठी पैसा व वेळ भरपूर खर्च होईल एवढे करूनही मराठवाड्यात सर्वत्र विखुरलेल्या मराठा जातीचा एकत्र आढावा घेता येईलच असे नाही. म्हणून हिंगोली मधील मराठा जातीचे प्रतिनिधित्व करू शकेल अशा एका लहान गटाची निवड करणे गरजेचे असते. त्यालाच समग्र असे म्हणतात.

प्रस्तुत संशोधनासाठी कार्यक्षेत्र किंवा समग्र म्हणून हिंगोली जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. हिंगोली जिल्ह्याची कार्यक्षेत्रासाठी निवड करण्याचे मुख्य कारण म्हणजे फार पूर्वीपासून हिंगोली जिल्हा मराठवाड्यामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आघाडीवर राहिलेला आहे. त्यामुळे मराठवाड्याचे प्रतिनिधित्व हिंगोली जिल्हा करू शकेल असा मला विश्वास वाटतो. माझे राहण्याचे ठिकाण हिंगोली जिल्हा असल्यामुळे व हिंगोली जिल्ह्याची प्राथमिक स्वरुपाची माहिती उपलब्ध असल्यामुळे मी प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र म्हणून हिंगोली जिल्ह्याची निवड केलेली आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

" हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास. " या संशोधन विषयाचे काही पैलू लक्षात घेऊन त्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन विषयासाठी आवश्यक असलेले तथ्ये ५०० उत्तरदात्याकडून संकलित करण्यात येणार आहे. ५०० कुटुंबाचा प्रातिनिधीक स्वरूपातून अभ्यास करून निष्कर्ष काढले जातील. संशोधन विषय मराठा जात असा असला तरी कार्यक्षेत्र म्हणून हिंगोली जिल्ह्याची निवड करण्यात येतील प्रत्यक्षात प्रदेशनिहाय विभागनिहाय भाषा सवयी, संस्कृती बदल असते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भारताच्या वेगवेगळ्या राज्यात मराठा जातीचे लोक राहतात महाराष्ट्रात तर मराठा बहुसंख्यांक आहेत तरीही सर्व भारतातील महाराष्ट्रातील मराठवाड्यातील मराठा जातीतील सर्व लोकांचा अभ्यास करणे शक्य नसल्याने केवळ हिंगोली जिल्ह्यातील ५०० एककांचा अभ्यास करून निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. ५०० कुटुंबाची माहिती कुटुंबप्रमुखाद्वारे मिळविली जाईल. त्यामुळे स्वाभाविकपणे असे म्हणता येईल की, प्रस्तुत संशोधनाला प्रबंधाला स्वतःच्याच काही मर्यादा आहेत. असे असले तरी प्रस्तुत प्रबंध मी वस्तुनिष्ठ, शक्य तेवढया निर्दोष व सत्य माहितीवर लिहिण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

नमुना निवड :

नमुना ' हा विश्व किंवा समग्रातून निवडण्यात आलेला भाग असतो. विश्वातील एका घटकास व्यष्टी किंवा एकक (Unit) असे म्हणतात. विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रातिनिधीक एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय नमुना शब्दाचा उपयोग केवळ कोणत्याही समग्राच्या एककास किंवा एका भागाकरिता केला पाहिजे. ज्या भागास या विश्वासाने निवडले असते की, तो समग्राचे प्रतिनिधित्व करील. वरील अध्ययनावरून हे स्पष्ट होते की, विश्व किंवा समग्रावरील एकूण

एककांपैकी काही प्रातिनिधीक एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. हा प्रातिनिधीक नमुना संपूर्ण समग्राचे प्रतिनिधित्व करत असतो. प्रस्तुतच्या संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीतील सोईस्कर नमुना निवड पद्धत वापरलेली आहे. कारण हिंगोली जिल्ह्यात, हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यातील किती मराठा कुटुंब आहेत. पाच तालुक्यातील कोणत्या गावात किती मराठा जातीचे लोक राहतात. याची विश्वसनीय सूची उपलब्ध नाही कारण १९३१ नंतर जातीवर आधारित जनगणना भारतात झालेली नाही. अधिकृत विश्वसनीय सूची उपलब्ध नसल्यामुळे सहेतुक नमुना निवडीतील सोईस्कर नमुना निवड पद्धती वापरलेली आहे. प्रस्तुतच्या संशोधनासाठी संशोधन (हिंगोली जिल्ह्यातून) समग्रातून ५०० कुटुंबाची अध्ययनासाठी नमुना म्हणून निवड करण्यात येईल. ही निवड करताना संपूर्ण समग्र पाच विभागात विभागण्यात येईल. कारण हिंगोली जिल्ह्यामध्ये पाच (औंढा, कळमनुरी, वसमत, सेनगाव आणि हिंगोली) तालुके आहेत. हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुक्यातील कुटुंबाचा नमुन्यात समावेश व्हावा, नमुना अधिक सर्वसमावेशक व्हावा, हिंगोली जिल्ह्यातील सर्व विभागातील मराठा जातीचे प्रतिनिधित्व नमुन्यात म्हणून प्रथम संशोधनाच्या समग्राचे तालुक्याच्या आधारावर पाच विभाग तयार करण्यात येईल, व या पाच तालुक्यातून (औंढा, कळमनुरी, वसमत, सेनगाव आणि हिंगोली) समान संख्येने १०० उत्तरदाते एकूण ५०० नमुना एककांची निवड करण्यात येईल.

तथ्य संकलन :

कोणत्याही संशोधनाचा मुख्य उद्देश सत्याचा शोध घेणे हाच असतो. त्यासाठी या घटनेच्या संदर्भातील वास्तविक तथ्याचे संकलन करणे गरजेचे असते. या संकलित केलेल्या तथ्यावरच संशोधन अवलंबून असते.

संशोधन पद्धतीमध्ये नमुना निवडीनंतर तथ्य संकलन हा महत्त्वाचा टप्पा आहे. कारण संपूर्ण संशोधन हे तथ्य संकलनावर अवलंबून असते. उपयुक्त नसणारी माहिती गोळा केली तर विनाकारण वेळ, पैसा व श्रम वाया जातात. अशा तथ्य संकलनामुळे निष्कर्ष चुकीचे निघतात. प्रस्तुत विषयावर

संशोधन करत असताना तथ्य संकलित केलेली आहेत. प्रस्तुत संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोत या माध्यमाने तथ्य संकलित केलेली आहेत. जी तथ्य संकलित केली ती निश्चित अर्थाने संशोधनासाठी उपयुक्त ठरलेले आहेत. त्याचा अनुभव प्रबंध लिहिताना आलेला आहे. प्रस्तुत संशोधनातील पहिल्या दोन प्रकरणासाठी दुय्यम स्त्रोतावर आधारलेला माहितीचा उपयोग केलेला आहे. नंतरची प्रकरणे प्राथमिक स्त्रोतावर आधारलेली आहेत.

अ) प्राथमिक स्त्रोत :

सामाजिक क्षेत्रातील संशोधनासाठी तथ्य संकलित करावी लागतात. त्याशिवाय कोणतेही संशोधन पूर्णत्वास जाऊ शकत नाही. अशी तथ्ये दोन प्रकारची असतात.

१) प्राथमिक तथ्य (Primary Data) आणि २) द्वितीय स्त्रोत (Secondary Data) यातील प्राथमिक तथ्य संकलित करण्यासाठी मुलाखत, अनुसूची प्रश्नावली, निरीक्षण इ. तंत्राचा वापर केला जातो. या तथ्यांनाच क्षेत्रीय स्त्रोत असे देखील म्हणतात. कारण संशोधनकर्ता स्वतः संशोधन क्षेत्रात जाऊन तथ्याचे संकलन करतो. प्रस्तुत विषयाचे स्वरूप लक्षात घेऊन प्राथमिक स्त्रोताद्वारे तथ्य संकलनासाठी अनुसूची या तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :

कोणत्याही ज्ञान शाखेतील संशोधन असो त्या संशोधनाचा पाया दुय्यम स्त्रोत हा असतो. कारण त्याशिवाय संशोधन विषयाशी संबंधित विविध संकल्पनांची ओळख होत नाही. विषय निवडीसाठी, संशोधन आराखडा तयार करण्यासाठी दुय्यम स्त्रोताचा आधार घ्यावाच लागतो. संशोधनाला सैद्धांतिक बैठक प्राप्त करून देण्यासाठी दुय्यम स्त्रोत महत्त्वाचे असतात.

दुय्यम स्त्रोत संशोधनाला सुरुवात करण्यापूर्वीच उपलब्ध असतात संशोधन विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करण्यासाठी दुय्यम स्त्रोत उपयोगाचे ठरत असतात. दुय्यम स्त्रोतात प्रकाशित व अप्रकाशित अशा लिखित माहितीचा समावेश होतो. प्रामुख्याने जनगणना अहवाल, जिल्हा

माहिती कार्यालय, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, विविध शासकीय अहवाल विविध संघटनानी प्रकाशित केलेले ग्रंथ, संदर्भ ग्रंथ शिलालेख पुरातन वाङ्मय नियतकालिके, चर्चासत्र, परिषदा, सर्वेक्षण अहवाल, वर्णन पत्रे ऐतिहासिक प्रलेख आत्मचरित्र दैनंदिनी मासिके इ. द्वारा वाचन लेखन करून संशोधकाला विषयाशी संबंधित तथ्ये संकलित करता येतील प्रस्तुतच्या संशोधन विषयासाठी दुय्यम स्त्रोताचाही मोठ्या प्रमाणावर आधार घेतलेला जाणार आहे. विशेषत : विषय निवड, विविध संकल्पनाची ओळख, संशोधन विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करण्यासाठी नमुना निवड करत असताना, संशोधन समग्र निश्चित करताना हिंगोली जिल्ह्यातील गावे आणि वेगवेगळया गावाची लोकसंख्या किती आहे हे समजावून घेण्यासाठी द्वितीयक स्त्रोताचा आधार घेतला जाणार आहे. या स्त्रोताच्या विविध आधारांपैकी जनगणना अहवाल, जिल्हा माहिती कार्यालय व सांख्यिकी कार्यालयाद्वारा प्रकाशित पुस्तके, अहवाल सेन्सास हँड बुक, विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, व्ही.सी.डी. इंटरनेट इ. चा वापर केला जाणार आहे.

संशोधन प्रक्रिया :

संकेतीकरण वर्गीकरण सारणीकरण :

सामाजिक शास्त्रातील संशोधनामध्ये संकेतीकरण, वर्गीकरण, सारणीकरण या तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या भूमिका बजावत असतात. या तीन घटकांमुळेच संशोधन प्रक्रिया सुलभ होत असते. संशोधनासाठी संशोधकाने जी तथ्य संकलित केलेली असतात ती तथ्य विस्कळीत स्वरूपाची असतात अव्याप्त स्वरूपाचे असतात. ते जसेच्या तसे वापरता येत नाहीत. जर ती तथ्य तशीच वापरली तर संशोधनाला शास्त्रीय अधिष्ठान प्राप्त होत नाही. निष्कर्ष अचूक निघत नाहीत. बऱ्याच मोठ्या स्वरूपाच्या बाबी थोडक्यात अचूकपणे व कमी वेळात मांडण्याचा उत्तम मार्ग वरील तीन बाबीमुळे शक्य होतो. अभ्यासविषयाचा आशय न बदलता संशोधनाच्या सर्व बाबी सुरक्षित ठेऊन संशोधन

आराखड्याच्या चौकटीत या तीन बाबी कार्य करत असतात. विशेष म्हणजे संकेतीकरण, वर्गीकरण, सारणीकरण या तीन बाबी परस्परपूरक व परस्परावलंबी स्वरुपाच्या आहेत. या तीनही बाबीचा उपयोग प्रस्तुतच्या संशोधनासाठी केलेला असेल.

संशोधनाची उपयोगिता :

कोणत्याही ज्ञानशाखेतील संशोधन असो त्याची उपयोगिता काय आहे हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनाची उपयोगिता खालीलप्रमाणे नमूद करता येईल. मराठा जातीचे लोक पूर्वी कोण होते, त्यांच्यातील पोटजाती आंतरसंबंध, श्रेष्ठत्व कनिष्ठत्व प्रस्तुत संशोधनामुळे स्पष्ट होईल. तसेच मराठा जातीचे एकूण स्वरुप इतरांना समजण्यास मदत होईल व मराठा जातीच्या संदर्भात असलेले गैरसमज दूर होतील. म्हणजेच लोकांच्या ज्ञानात भर पडणार आहे. हीच या संशोधनाची उपयोगिता आहे. प्रस्तुतचे संशोधन शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणा - या वेगवेगळ्या संस्था, संघटना व शासनासाठी उपयोगाचे ठरणारे आहे. कारण प्रस्तुत संशोधनामधून मराठा जातीतील शैक्षणिक मागासलेपणा, त्याबाबतची कारणे शोधली जाणार आहेत. थोडक्यात मराठा जातीतील लोकांमध्ये मराठा जातीतील असलेला शैक्षणिक मागासलेपणा कमी करण्यासाठी शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची उपयोगिता आहे.

प्रस्तुतचे संशोधन मराठा जातीतील असलेल्या अनेक सामाजिक समस्या सोडविण्यासाठी उपयोगाचे ठरणार आहे. म्हणजे सामाजिक समस्यांच्या निर्मूलनासाठी प्रस्तुत संशोधनाची उपयोगिता आहे कारण प्रस्तुत संशोधनामध्ये मराठा जातीतील लोकांमध्ये असलेली हुंडाप्रथा, बालविवाह, घटस्फोट, पुनर्विवाह, स्त्रियांचे आरोग्य व्यसनाधिनता इ सारख्या काही सामाजिक समस्यांचे अध्ययन केले जाणार आहे त्याबाबतची कारणमीमांसा केलेली असेल. त्यामुळे सामाजिक समस्या सोडविण्यासाठी या संशोधनाची उपयोगिता नमूद करता येते.

प्रकरणाचा आढावा :

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठा समाजाचा इतिहास व प्रशवभूमी द्वारे प्रस्तावना तसेच संशोधनासाठी निवाल्देल्या संशोधन पद्धतीचे विश्लेषण करण्यात येणार आहे..

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन

या प्रकरना मध्ये संशोधन विषययाच्या संदर्भात इतर अभ्यासकांनाही केलेल्या अभ्यासाचा आडवा घेण्यात येणार आहे तसेच मराठा समाजाच्या आर्थिक आणि समाजिक स्थिती बाबत संशोधन साहित्याचे पुर्विलोकन केल्या जाणार आहे.

प्रकरण तिसरे : हिंगोली जिल्ह्याची ओळख

प्रस्तुत प्रकरना मध्ये हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीच्या संदर्भात हिंगोली जिल्ह्याची ओळख करून देण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : मराठा समाजाची पार्श्वभूमी

प्रतुत प्रकरना मध्ये महाराष्ट्र हिंगोली मधील मराठा समाजाच्या दृष्टिकोनातून हिंगोली जिल्ह्या तील मराठा समाजाच्या इतिहासाच्या पार्श्वभूमी ची ओळख करून देण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : तथ्यांचे विश्लेषण आणि सादरीकरण

प्रस्तुत प्रकरण मध्ये हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीच्या संदर्भात प्राथमिक आणि व्दितीय स्त्रोता च्या द्वारे माहिती संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे विश्लेषन करण्यात येणार आहे. या मध्ये हिंगोली जिल्ह्यातील ५ तालुक्यातील पाचही तालुक्यांचा सहेतुक नमुना

निवड पद्धती ने नमुन्यांची निवड करून त्यात प्रत्येक्ष नमुन निवडी द्वारे पाच तालुक्यांतील १०० गावांची निवाड करून प्रत्येक गावातून ०५ कुटुंबे म्हणजे असे एकूण ५०० कुटुंबियांची माहिती संकलित करून हिंगोली जिल्ह्यातील मराठा समाजाच्या आर्थिक आणि समाजजीक स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणा मध्ये संशोधनाचे उद्देश आणि गृहितांचे परीक्षण करून मराठा समाजाच्या स्थिती च्या विषय निष्कर्ष काढण्यात येणार आहेत व मराठा समाजाच्या विकासा मध्ये निर्माण होणाऱ्या समष्या वरील उपाय योजना सुचविल्या जाणार आहेत आहे तशेच मराठा समाजाच्या सर्वांगीण विकास साठी शासनाकडे मापक शिफारशींची मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भसूची :

१. पाटील, बा.भा. (२००६), संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, पुणे पृ.क्र. १६

२. बोधनकर व अलोणी (२००७), सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ४५

३. घाटोळे, रा. ना. (२००३), समाजशास्त्रीय तत्त्वे व पध्दती श्री मंगेश प्रकाशन ४.

४. नागपूर, पृ.क्र. ११ बोधनकर व अलोणी (२००७) सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ४१

५. संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे डॉ. प्रदीप आगलावे, विद्या प्रकाशन, नागपूर, जानेवारी २०००, पृ. १४४

६. भारतीय संस्कृतिकोश- संपा. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३, पृ. ७४९. ५ कित्ता, पृ. ७५०

७. मराठवाड्याचा इतिहास - डॉ. सोमनाथ रोडे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून १९९९, पृ. ५० कित्ता, पृ. ५१.

८. मराठवाड्याचा इतिहास प्रा. एस. एस. भांडवलकर, प्रा. यु. एस. हनवते, अभिजित पब्लिकेशन, हिंगोली, जून १९९९, पृ. १९.

९. महाराष्ट्रातील जिल्हे, हिंगोली जिल्हा माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, डिसेंबर १९९८, पृ. ९.१०.

१०. डॉ. देविसिंह चौहान गौरव ग्रंथ- सु. ग. जोशी, मराठवाडा संशोधन मंडळ, हिंगोली, मार्च १९९९, पृ. ३९९.

११. भारतीय संस्कृतिकोश- संपा. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे २, खंड सहावा, तृतीय आवृत्ती, २००३, पृ. ७५१.

१२. इंटेलेक्चुअल्स संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टिकोन संपा. डॉ. के. जी. पठाण आणि डॉ. व्ही. एस. मंगनाळे, खंड ५ वा इंटेलेक्चुअल बुक ब्युरो, ५, नारायण नगर, होशंगाबाद रोड, भोपाळ ४६२०२६ (म.प्र.), पृ. ४८.

१३. महाराष्ट्रातील जिल्हे. के. सागर के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पृ. १६ ९.

१४. Census Handbook Latur Census of India 1991 Series 14 intl. Part XII A and B, Destrict CI. Intl. State, Mumbai -.No. 11. ११७

१५. मराठी विश्वकोश तकतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ सचिवालय, मुंबई, खंड १५ नोव्हेंबर १९७६, पृ. ३ ९

१६. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन २००५-०६ जिल्हा नांदेड- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. २.

१७. महाराष्ट्रातील जिल्हे : हिंगोली. माहिती व जनसंपर्क आणि महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, डिसेंबर १९८८, पृ. ८

१८. संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे डॉ. प्रदीप आगलावे, विद्या प्रकाशन, नागपूर, जानेवारी २०००, पृ. १७०. २२. कित्ता, पृ. १७१.

१९. मराठवाड्याचा इतिहास प्रा. एस. एस. भांडवलकर प्रा. यु. एस. हनवते अभिजित पब्लिकेशन, हिंगोली, जून १९९९, पृ.१ ९४. भारतीय समाजव्यवस्था- एम. जी. कुलकर्णी, परिमल प्रकाशन, औरंगाबाद डिसें. १९७५, पृ. ११०,

-: मार्गदर्शक :-
डॉ. प्रा . सूर्यकांत टी. पवार
विभाग प्रमुख (अर्थशास्त्र)
लोकमान्य महाविद्यालय सोनखेड,
ता. लोहा जिल्हा. नांदेड

-: संशोधक :-
कमलकिशोर शिवाजी तोडे
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड